‘A++’ Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

४४ /२०२६

**विषय -महात्मा गांधी जयंती निमित्त 'विशेष स्वच्छता' अभियान**

सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेत्तर सेवक यांना कळविण्यात येते की, महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून **दि. २९ सप्टेंबर, २०२६ ते दि.०१ ऑक्टोबर, २०२६** या कालावधीमध्ये शिवाजी विद्यापीठ परिसरामध्ये **‘विशेष स्वच्छता अभियान’** राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत आपण सर्वांनी आपला विभाग/ अधिविभागाची अंतर्गत स्वच्छता करावी. आपल्या अधिविभाग व विभागातील सध्या वापरात न येणारे व निरुपयोगी व नियमानुसार निर्लेखन करणे आवश्यक असणाऱ्या साहित्याबाबत नियमानुसार योग्य कार्यवाही करावी. याकरिता निर्लेखनाबाबत साठापडताळणी विभागाने सर्व अधिविभाग व प्रशासकीय विभाग यांना आवश्यक ते सहकार्य करावे. तसेच, आपल्या विभाग/ अधिविभागाच्या इमारती सभोवतालच्या परिसराची स्वच्छता करावी. या कालावधीत विभाग/अधिविभाग, व आजूबाजूच्या परिसरात कोणताही कचरा व कचरासदृष्य साहित्य राहणार नाही यास्तव आवश्यक सर्व कार्यवाही करावी.

उपरोक्त केलेल्या कार्यवाहीचा अहवाल (फोटोसह) वरिष्ठांच्यामार्फत आस्थापना विभागास सादर करण्यात यावा.

(डॉ. व्ही. एन. शिंदे )
कुलसचिव

जा. क्र. आस्थापना/ २११६
दि. 29 SEP 2026

प्रति,

माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थी/विद्यार्थीनींनी
२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
३) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.